# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२

*दूरध्वनी ०७२१-२६६२०२५ फॅक्स ०७२१-२६६२८४३*

ईमेल : rdc.amravati@gmail.com वेबसाईट : amravati.nic.in

क्र.कक्ष-२१/आस्था/अका/कावि-१८१७/२०१५ दिनांक : १४ ऑक्टोंबर, २०१५.

प्रति,

--------------------

--------------------

--------------------

विषय : जिल्हाधिकारी यांचे आस्थापनेवरील गट "क" "तलाठी" संवर्गातील पदभरती सप्टेंबर-२०१५.
तलाठी संवर्गातील आदिवासी क्षेत्रातील स्थानिक उमेदवारांचे मूळ कागदपत्र पडताळणीबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र, क्र.कक्ष-२१/आस्था/अका/कावि-१७८३/२०१५, दि.०१.१०.२०१५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी यांचे आस्थापनेवरील गट "क" तलाठी संवर्गातील पदभरती सप्टेंबर-२०१५ च्या लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार आपली मूळ कागदपत्र, अर्जाची प्रत, चलानची प्रत, ओळखपत्र, दोन फोटो आणि कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित केलेल्या संचासह पडताळणीकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दि. ०५.१०.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार आपण जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे उपस्थित झालेले आहात. परंतु आपल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, उमेदवारांनी स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई वडील किंवा आजी आजोबा अमरावती जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत असल्याचा पुरावे परिपूर्ण सादर केलेले नाहीत. त्यामळे आपणांकडून दि.२६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत असल्याचा परिपूर्ण पुरावे जिल्हाधिकारी कार्यालय येथे सादर करण्याकरीता आपणांस अंतिम मुदत दि.१७.१०.२०१५ पर्यंत देण्यात येत आहे.

तरी आपण अंतिम दि.१७.१०.२०१५ पर्यंत अमरावती जिल्हयामधील अनुसूचीत क्षेत्रामधील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांधून अर्ज केलेल्या उमेदवारांनी स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई वडील किंवा आजी आजोबा अमरावती जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत असल्याचा पुरावा (उदा. कोतवाल बुकाची नक्कल, वंशावळ, हक्कनोंदणी, खातेपुस्तिका, १९५० पूर्वीचा रहीवास दर्शविणारे कागदपत्र) असल्याचे मूळ कागदपत्र व कागदपत्र साक्षांकित केलेल्या कागदपत्राच्या प्रतीसह कागदपत्र सादर करावे.

जिल्हाधिकारी, अमरावती

प्रतिलिपी :

जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना महितीकरिता तथा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषित.

जिल्हाधिकारी, अमरावती